**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ०८ | बुधवार,दि.२९ जानेवारी २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर

**नवी दिल्ली :** जवळपास गेल्या ४ वर्षांपासून लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होते. सर्वोच्च न्यायालयात आज २३ व्या नंबरवर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व ओबीसी आरक्षण यांच्यातील याचिकेवर अंतिम सुनावणी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, पुन्हा एका तारीख पे तारीख पाहायला मिळाली आहे. राज्य सरकारच्यावतीने तुषार मेहता यांनी बाजू मांडली. त्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी नवी तारीख दिली असून पुढील सुनावणी २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यामुळे, आणखी जवळपास एक महिन्यानंतर ही सुनावणी होणार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याचं दिसून येत आहे. दरम्यान, दुसरीकडे राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली असून शिवसेनेकडून मुंबई महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा देखील केली आहे. मात्र, अजून काही काळ सर्वांनाच वाट पाहावी लागेल.

कोर्टाने कुठेही निवडणुकांना स्थगिती दिली नाही. पण, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडे याबाबत निर्णय घेण्याची विनंती केली होती. त्यातच, आज न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासंदर्भात काही जणांना न्यायालयात धाव घेतली आहे. ओबीसी आरक्षण असो की नसो पण निवडणुका व्हाव्यात अशी मागणी या याचिकाकर्त्यांनी आहे. दरम्यान, राज्यात महायुतीचं सरकार आल्यानंतर, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच व्हाव्यात यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते. राज्य सरकार म्हणून न्यायालयात बाजू मांडताना सर्वोच्च न्यायालयाकडून लवकरात लवकर अंतिम सुनावणी करावी अशी विनंती असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले होते. आता, याप्रकरणी आज झालेल्या सुनावणीत न्यायालयाने २५ फेब्रुवारी ही नवी तारीख दिली असून पुढील सुनावणी तेव्हाच होणार आहे. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणखी काही काळ पुढे ढकलण्यात आल्याचं दिसून येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचे भविष्य असणार आहे. यावर्षी निकाल लागण्यासाठी सरकार शर्थीचे प्रयत्न करणार आहे. राज्यातील २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष आहे. तसेच, राजकीय पक्षांनीही मोर्चेबांधणी सुरू केली असून पक्षाचे मेळावे व बैठकांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना बळ दिलं जात आहे.

# ओबीसी वसतिगृहातील विद्यार्थी भोजन-निर्वाह भत्त्यापासून वंचित



### विद्यार्थ्यांकडून नाराजी,आंदोलनाचा इशारा

**भोजन भत्यासाठी प्रतिमहिना २ कोटींवर निधीची आवश्यकता असते. चार महिन्यांसाठी सुमारे आठ कोटींची गरज असताना, ओबीसी विभागाने ६ जानेवारीला १० लाख आणि २० जानेवारीला ५ लाख असे केवळ १५ लाख रुपये भोजन भत्त्यासाठी देण्याच्या संदर्भाने शासन निर्णय काढला. हा प्रकार विद्यार्थ्यांची थट्टा करणारा आहे. या संदर्भाने आंदोलन छेडू,**

**- प्रा. दिवाकर गमे, माजी संचालक, महाज्योती**

**ओबीसी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना चार महिन्यांपासून भोजन-निर्वाह भत्ता मिळालेला नाही. या संदर्भाने अनेक विद्यार्थ्यांकडून नाराजीचा सूर काढण्यात येत आहे. अध्यादेश निघाला. परंतु थेट रक्कम द्यायची, की भोजन व्यवस्था करायची, यावर एकमत होऊ शकले नाही. यातूनच रक्कम रखडली आहे.**

**-खेमेंद्र कटरे, संयोजक ओबीसी अधिकार मंच**

**या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या आठवड्यात भोजन-निर्वाह भत्ता ओबीसी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अदा केला जाणार आहे.**

**- अतुल सावे, मंत्री, ओबीसी विभाग.**

**गोंदिया:-** राज्यातील ५८ ओबीसी वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मागील चार महिन्यांपासून भोजन-निर्वाह भत्त्यापासून वंचित आहेत. थेट बँक खात्यावर रक्कम वर्ग (डीबीटी) करायची की भोजनच द्यायचे, या निर्णयात एकमत होऊ न शकल्यामुळे विद्यार्थी वंचित राहिल्याचे सांगितले जात आहे. या संदर्भात विद्यार्थ्यांनी आता आंदोलनाची हाक देण्याची तयारी सुरू केली आहे.

राज्यातील ५८ शासकीय ओबीसी वसतिगृहांत सुमारे ४ हजार ६० विद्यार्थी विद्यार्थिनी प्रवेश घेऊन सप्टेंबर २०२४ पासून राहत आहेत. प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ओबीसींच्या शासकीय वसतिगृहातील भोजनकक्षात (मेस) भोजन उपलब्ध होत नाहीये. त्यामुळे त्यांना बाहेरून जेवण घेण्यासाठी भोजन भत्ता म्हणून दरमहा ४ हजार ५०० रुपये व निर्वाह भत्ता ६००, तर विद्यार्थिनींना ८०० रुपये अशी अनुक्रमे ५ हजार १०० व ५ हजार ३०० रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. संबंधित रक्कम डीबीटीद्वारे दर महिना त्यांच्या खात्यावर देण्याचा अध्यादेश शासनाकडून २९ नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार काढण्यात आला होता. असे असताना मागील तीन ते चार महिन्यांपासून वसतिगृहातील सुमारे चार हजारांवर विद्यार्थी-विद्यार्थिनी भोजन व निर्वाह भत्त्यापासून वंचित आहेत.

# मुख्य रस्ता ठरला वाहनतळ



**गोंदिया:-** रस्ते आवागमनासाठी असतात. परंतु, त्यांचा चक्क वाहनतळ म्हणून वापर होत असल्याचा प्रकार शहरात दिसून येत आहे. अतिक्रमाणामुळे अरुंद रस्ते, वाहनांची वर्दळ, नियोजनाचा अभाव आदी कारणांमुळे शहरात वाहतुकीची कोंडी नित्याची बाब झाली आहे. खरेदीनिमित्त बाजारपेठेत होत असलेल्या गर्दीची त्यात भर पडते आहे. बाजारपेठेतील रहदारीला शिस्त लावण्याची गरज आहे.

शहर जिल्ह्याचे मुख्यालय आहे. येथे मोठी बाजारपेठ आहे. बाजारपेठेला लागूनच रेल्वे स्थानक आहे. बाजारपेठेतील अरुंद रस्ते आणि त्यातच झालेले व्यावसायिकांची अतिक्रमण वाहतूक कोंडीत अधिकची भर घालत आहेत. कुडवा चौक ते अवंतीबाई चौकपर्यंतच्या मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूला व्यापारी प्रतिष्ठाने आहेत. प्रतिष्ठानांनी पार्किंगसाठी जागा ठेवली नसल्याने ग्राहक मुख्य मार्गावर त्यांची वाहने उभी करून ठेवतात.

जनु या रस्त्याला वाहन स्थळाचे स्वरूप प्राप्त होते. अशी स्थिती शहरातील इतरही रस्त्यांवर दिसून येते. शहरातील मुख्य मार्गावरून रोज शेकडो वाहनांचे आवागमन होते. याशिवाय फुलचूर नाका, मनोहर चौक, जयस्तंभ चौक, गांधी प्रतिमा चौक, चांदणी चौक या मुख्य मार्गावर वाहतुकीची समस्या हा कळीचा प्रश्न आहे. सणासुदीच्या दिवसात ही समस्या अधिक तीव्र रूप धारण करते. रस्त्याच्या बाजूला दुकानदारांनी केलेले अतिक्रमण, रस्त्याच्या कडेला लागणारी फेरीवाल्यांची व स्थायी दुकाने त्यामुळे या रस्त्यांची कोंडी झाली आहे. ट्रॉफिक जामचा रोजच सामना करावा लागतो. येथील बाजारात येणाऱ्या नागरिकांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करून पार्किंग प्लाझा नावाने भव्य इमारत साकारण्यात आली आहे, परंतु येथे वाहने नावालाच उभी दिसतात.

### बेशिस्त वाहतुकीचा फटका

**शहरातील बाजारपेठ मार्गावर असल्याने खरेदीसाठी जिल्ह्यासह शहरातील नागरिक येथे येतात. नागरिक त्यांची वाहने पार्किंग प्लाझामध्ये न ठेवता भररस्त्यावर अस्ताव्यस्तपणे उभी करतात. रहदारीला त्रास होणार नाही, याची खबरदारी कोणीही घेत नाही. नागरिक, वाट्टेल त्या पद्धतीने वाहने उभी करतात. याचा फटका रहदारी करणाऱ्यांना बसतो.**

### वाहतूक यंत्रणा सुस्त

**शहरातील वाहतूक यंत्रणेवर नियंत्रण ठेवण्याचे, शिस्त लावण्याचे काम वाहतूक पोलिसांचे आहे. परंतु, पोलिस मात्र फक्त सावज शोधण्यातच वेळ घालवतात. वाहतूक पोलिस यंत्रणेत शिथिलता आली की काय असेच दिसून येते. सणासुदीच्या दिवसात मोहीम राबवून रस्त्यावर बेशिस्तीने वाहन ठेवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते. वाहतुकीला शिस्त लावण्याची गरज आहे.**

# कचारगडला आदिवासी विभाग उभारणार साँस्कृतिक भवन-आदिवासी मंत्री उईके



### कचारगड यात्रेदरम्यान पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्याचे आदेश जारी

**सालेकसा तालुक्यातील कचारगड (धनेगाव) येथे येत्या १० ते १४ फेब्रुवारी २०२५ पर्यंत "महाकाली कंकाली कोपरलिंगा' यात्रा होणार आहे. सदर यात्रेत महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्यातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होतात. त्या ठिकाणी भाविकांची व त्यांच्या वाहनांची वाहतुक होत असते. त्यामुळे जड-अवजड वाहनापासून यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होवून गंभीर स्वरुपाचे अपघात होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी प्रजित नायर यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये त्यांनी आमगाव कडून डोंगरगड कडे जाणारे व येणारे जड अवजड वाहने (एस.टी.बस व अग्नीशमन वगळून) १० फेब्रुवारी रोजी सकाळी ५ वाजेपासून ते १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत आमगाव-सालेकसा-डोंगरगड कडे जाणारी जड-अवजड वाहतूक पुर्णत: बंद करुन आमगाव-देवरी-डोंगरगड या पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे. तसेच डोंगरगड-सालेकसा-आमगाव कडे येणारी जड-अवजड वाहतूक पुर्णत: बंद करुन डोंगरगड-देवरी-आमगाव या पर्यायी मार्गे वळविण्यात येत आहे असे एका अधिसूचनेद्वारे आदेश जारी केले आहे. असे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी प्रजित नायर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.**

**गोंदिया:-** गोंदिया जिल्ह्यातील प्रसिध्द असलेल्या पर्यटनस्थळ कचारगड येथे येत्या १० फब्रुवारीपासून आदिवासी समाजाचे धार्मिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या परिसराच्या ठिकाणी देशभरातून येणाऱ्या समाजबांधवासह पर्यटकाकरींता सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.सोबतच आदिवासी समाजाच्या साँस्कृतिक जडणघडणीसह परंपरेचे दर्शन व्हावे याकरीता आदिवासी विभागाच्यावतीने धनेगाव येथे आदिवासी साँस्कृतिक भवन उभारण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी दिली.ते गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकारपरिषदेत बोलत होते. यावेळी खासदार नामदेवराव किरसान,माजी खासदार अशोक नेते,आमदार इंजि.राजकुमार बडोले,संजय पुराम आदी उपस्थित होते.

कचारगड येथील यात्रेत भाविकांना कुठलाही त्रास होऊ नये तसेच परिसरातील भागातील घटनांवर नजर ठेवण्याकरीता सीसीटीव्ही कॅमेरे लावणे,स्वच्छता विभागाच्यावतीने तात्पुरते सार्वजनिक शौचालयासह २४ तास पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती दिली. तर गेल्या १० वर्षात कचारगड याठिकाणी कोट्यवधी रुपये खर्च करुनही तेथे आजही पर्यटन व तिर्थस्थळाच्या दृष्टीने सोयीसुविधांचा अभाव असल्याच्या मुद्यावर यापुढे त्याठिकाणी वर्षभर पर्यटकांकरीता सर्वसुविधा उपलब्ध करुन देण्याचा विचार करण्यात येणार असल्याचे ना.उईके यांनी सांगितले.

## दोन वर्षापासून रखडले प्रतापगड यात्रेचे शासकीय अनुदान

**अर्जुनी मोर**-तालुक्यातील प्रतापगड येथे महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर भव्ययात्रा भरत असते. हिंदू-मुस्लिम एकात्मतेची साक्ष ठरणारा हा ऐतिहासिक सोहळा दरवर्षी महाशिवरात्री यात्रा व उस्मान गणी हारुणी उर्स हा पाच दिवसीय कालावधीसाठी साजरा करण्यात येते. मात्र यात्रेचे नियोजन करण्यासाठी लागणारा खर्च यासाठी जिल्हा परिषद गोंदियाकडून गेल्या दोन वर्षापासून शासकीय अनुदान मिळाले नसल्याने यावर्षीच्या यात्रेच्या खर्चासाठी निधी कुठून आणावा हा प्रश्न निर्माण झाल्याची माहिती प्रतापगडचे सरपंच भोजराम लोगडे यांनी दिली.

तालुक्यातील गट ग्रामपंचायत प्रतापगड अंतर्गत ऐतिहासिक प्रतापगड येथे दरवर्षी महाशिवरात्री यात्रा व उस्मान गणी हारून उर्स मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येते. व सदर उत्सव हा पाच दिवसीय कालावधी करीता साजरा करण्यात येत असून त्यानिमित्ताने विविध भागातून पाच ते सात लाख भाविक दर्शनाकरिता व उत्सव साजरा करण्याकरिता येत असतात. व ग्रामपंचायत अंतर्गत सदर भाविकांची गैरसोय होऊ नये याकरिता सर्व शासकीय व प्रशासनिक विभागामार्फत ग्रामपंचायतला आदेशित करून त्या हेतूने ग्रामपंचायत सर्व विभागाच्या सहकार्याने यात्रा उत्सव पूर्ण करीत असते. सदर यात्रा नियोजन पूर्ण करण्याकरिता ग्रामपंचायतीला यात्रा अनुदान २५१५ व जिल्हा निधी शिर्षकाखाली प्राप्त होत असते. दरवर्षीच यात्रा नियोजन करण्याकरिता शासकीय अनुदानाची मागणी करण्यात येते. परंतु सन २०२२- २३ या वर्षापासून ग्रामपंचायतला मिळणारे अनुदान मागणीनुसार तूटपुंज्या स्वरूपात मिळालेले असून सन २०२३- २४ मधील अनुदान अप्राप्त आहे. आणि याबाबत ग्रामपंचायतीने वारंवार लेखी पत्राद्वारे मागणी केलेली आहे.

# गोंदिया जि.प.अध्यक्षपदी भाजपचे लायकराम भेंडारकर,उपाध्यक्ष राकाचे हर्षे



**गोंदिया:-** जिल्ह्याचे मिनी मंत्रालय समजण्यात येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाकरीता २४ जानेवारी रोजी निवडणूक झाली. त्यासाठी कमी सदस्यसंख्या असतानाही महाआघाडीकडून काँग्रेसने दोन्ही पदांकरीता अर्ज दाखल केले होते.मात्र सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी सामंजस्याने केलेल्या चर्चेनंतर काँग्रेसने आपले दोन्ही अर्ज मागे घेतले. परिणामी अध्यक्षपदी भाजपचे बोंडगावदेवी जिल्हा परिषद क्षेत्राचे लायकराम भेंडारकर आणि उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे घाटटेमनी क्षेत्राचे सदस्य सुरेश हर्षे यांची बिनविरोध निवड झाली. आता सभापतीपदाच्या निवडणुकीतही हाच फॉर्म्यूला राहणार आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेची निवडणूक २०२२ मध्ये झाली. ५३ सदस्यसंख्या असलेल्या जिल्हा परिषदेच्या झालेल्या निवडणुकीत भाजपचे २६, काँग्रेसचे १३, राष्ट्रवादीचे ८, आमदार विनोद अग्रवाल यांच्या चावी गटाचे ४ आणि अपक्ष २ सदस्य निवडून आले. पहिल्यांदा सत्ता स्थापनेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि दोन्ही अपक्षांनी भाजपला साथ दिली. त्यावेळी अध्यक्षपदी पंकज रहांगडाले यांची वर्णी लागली. तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादीचे यशवंत गणवीर यांची निवड झाली. त्याचबरोबर राष्ट्रवादीला एक सभापतीपद, तर भाजपला दोन, राष्ट्रवादीला एक आणि अपक्ष एक सभापतिपद मिळाले होते. मधातच विधानसभा निवडणूक आल्यामुळे जिल्हा परिषदेतील पदाधिकाऱ्यांची खांदेपालट दोन वर्षांवरून अडीच वर्षांवर गेली. अखेर आज, २४ जानेवारी रोजी अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाकरीता निवडणूक घेण्यात आली. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे दोन्ही पदे जुन्याच फॉर्म्युल्यानुसार राहतील, हे आधीच ठरले होते. त्यानुसार अध्यक्षपदाकरीता भाजपकडून अर्जुनी मोरगाव तालुक्यातील बोंडगावदेवी जि.प. क्षेत्राचे सदस्य आणि आमदार राजकुमार बडोले यांचे निकटवर्तीय समजण्यात येणारे लायकराम भेंडारकर यांनी अर्ज दाखल केला. तर उपाध्यक्षपदाकरीता जुन्या फॉर्म्युल्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेसकडून घाटटेमनी जि. प. क्षेत्राचे सदस्य तथा राष्ट्रवादीचे गटनेते सुरेश हर्षे यांनी अर्ज दाखल केला होता. तर काँग्रेसकडून अध्यक्षपदाकरीता सशेंद्र भगत आणि वंदना काळे यांनी उपाध्यक्षपदाकरीता नामांकन दाखल केले होते. मात्र काँग्रेसच्या दोन्ही सदस्यांनी नामांकन परत घेतले. परिणामी भाजपचे लायकराम भेंडारकर आणि उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीच्या वेळी आमदार इंजि.राजकुमार बडोले, आमदार विनोद अग्रवाल, आमदार विजय रहांगडाले, माजी आमदार राजेंद्र जैन, भैरसिंह नागपूरे,खोमेश्वर रहांगडाले व माजी जि.प.अध्यक्ष नेतराम कटरे यांची विशेष उपस्थितीत होती.

### सभापतीपदासाठी १० ला निवडणूक

**जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष ठरले. त्यांची बिनविरोध निवड झाली. आता पाचही विषय समित्यांसाठी येत्या १० फेब्रुवारी रोजी निवडणूक घेण्यात येणार आहे. गेल्या अडीच वर्षांच्या काळात अर्थ व बांधकाम, महिला बालकल्याण ही पदे भाजपकडे होती. तर राष्ट्रवादीकडे समाजकल्याण आणि शिक्षण व आरोग्य ही पदे होती. तर एका अपक्षाकडे कृषी व पशुसंवर्धन खाते होते. आता पदांचा हाच फॉर्म्युला पुढच्या अडीच वर्षांसाठी कायम राहणार आहे. चेहरे मात्र बदलणार असून कोणत्या चेहऱ्याला पसंती मिळते, हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे.**



# सहकार क्षेत्राचे करणार बळकटीकरण-बाबासाहेब पाटील



### विदर्भातील सहकार चळवळ पुनरुज्जीवित करणार

### रिक्तपदे प्राधान्याने भरणार

**शासकीय विभागात अधिकारी,कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. जिल्ह्याचे विभाजन होऊन २५ वर्षे पूर्ण झाली तरी अजूनही काही कार्यालयांचा कारभार भंडारा येथून पाहिला जात आहे. ही समस्या त्वरित मार्गी लावण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केली आहे. तसेच गोंदिया येथील कार्यालयात किमान दोन दिवस तरी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याच्या सूचना केल्या आहेत. स्थानिक समस्या मार्गी लावण्याच्या सूचना पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केल्या.**

### वर्षातून तीन बैठका

**वर्षभरात तीन बैठका निश्चित होतील. त्याशिवाय वेळोवेळी जिल्ह्याचा दौरा करून स्थानिक प्रश्न मार्गी लावण्याला प्राधान्य दिले जाईल. सर्वांना सोबत घेऊन गोंदिया जिल्ह्याच्या विकासाला गती देणार असल्याची ग्वाही पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.**

### स्थानिक पालकमंत्र्यांची मागणी आहे रास्तच

**पालकमंत्री स्थानिक असायला हवा अशी जिल्हावासीयांची आणि लोकप्रतिनिधींची मागणी आहे. ती मागणी रास्त असून पालकमंत्री स्थानिकच असायला हवा हे माझेसुद्धा वैयक्तिक मत आहे. स्थानिक पालकमंत्र्यांमुळे विकासाला गती व प्रश्नांची जाणीव असल्याने ती पोटतिडकीने मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जातो, स्थानिक विकासाला गती मिळते असे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.**

### पहिल्याच बैठकीत घेतले चार धडक निर्णय

**व्यायामशाळांची कामे रद्द करून नव्याने निविदा काढणे, प्रत्येक तालुक्यात एक डिजिटल शाळा तयार करणे, शेतकऱ्यांना नियमित वीज पुरवठा व्हावा यासाठी नवीन ट्रॉन्सफॉर्मरकरिता १५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद, जिल्ह्यातील पर्यटन विकासाला चालना देण्यावर भर असणार.**

**गोंदिया :-** सहकार क्षेत्राचे बळकटीकरण कसे करता याच अनुषंगाने नुकतीच केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. त्यात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सहकार क्षेत्राला आधुनिक टच दिला जाणार असून संबंधित सर्व विभागाचे संगणकीकरण करण्यात येणार आहे.

याशिवाय काही ठोस निर्णय घेऊन सहकार क्षेत्राचे लवकरच बळकटीकरण केले जाणार असल्याचे राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

सहकार मंत्री पाटील हे शनिवारी (दि. २५) गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून शेतकरी व सहकारी संस्थांना बळ देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासाठी सेवा सहकारी संस्था, सहकारी तत्त्वावरील बँका, पतसंस्थांना अल्पदराने कर्ज पुरवठा, त्यांच्या संगणकीकरणासाठी निधी, सेवा सहकारी सोसायट्यांना गोदाम बांधकामासाठी वेगळा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

विविध सेवा सहकारी सोसायटीमध्ये कार्यरत गट सचिवांना जिल्हा बँकांशी कसे जोडता येईल व त्यांची अनेक दिवसांपासून अडचण कसे दूर करता येईल, या दृष्टीने सुद्धा पाऊले उचलण्यात येणार आहे.

सहकार चळवळ पुनरुज्जीवित करणार

एकेकाळी विदर्भात सहकार क्षेत्राचे जाळे भक्कम होते. पण अलीकडच्या काही वर्षात विदर्भातील सहकार चळवळीवर मरगळ आली आहे. ही मरगळ दूर करून विदर्भातील सहकार क्षेत्राला पुन्हा बळकट करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

कामाची फेरनिविदा काढणार,व्यायामशाळांची कामे रद्द : सर्व तालुक्यांना समान निधी द्या

गोंदिया : जिल्ह्यात क्रीडा विभागाच्या माध्यमातून व्यायामशाळा, ग्रीन जिमची अनेक कामे करण्यात आली आहे तर काहींची कामे सुरू आहेत. पण या बांधकामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. जिल्ह्यातील आमदारांनीसुद्धा यासंबंधी तक्रारकेली आहे. त्यामुळे व्यायामशाळा, ग्रीन जिमची सर्व कामे रद्द करून नव्याने निविदा काढून कामे करण्याचा निर्णय जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत घेण्यात आल्याचे राज्याचे सहकारमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

पालकमंत्री बाबासाहेब पाटील शनिवारी (दि.२५) जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. जिल्हा नियोजन समितीची माझ्या कार्यकाळातील पहिलीच बैठक असल्याने यात जिल्ह्यातील प्रमुख प्रश्न स्थानिक आमदार अधिकाऱ्यांकडून जाणून घेतल्या.

## संपादकीय

# दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांचा विचार करता बारावीच्या हॉल तिकिटावर जात व प्रवर्गाचा उल्लेख केलेला होता. त्यामुळे बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये निराशाजनक वातावरण दिसून आले. तेव्हा बोर्डाची परीक्षा अगदी तोंडावर आल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविणे गरजेचे असते. आज आपण विज्ञान युगात वावरत आहोत याची जाणीव परीक्षा मंडळाला असायला हवी होती. तसे झालेले दिसत नाही. त्यापेक्षा बोर्डाने परीक्षेच्या निकालाच्या वेळी विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी सुद्धा प्रसिद्ध करण्यात येईल असे जर मुलांना संकेत दिले असते तर विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन मिळाले असते. कारण परीक्षा बोर्डाने गेली अनेक वर्षे गुणवत्ता यादी प्रसिद्ध केलेली नाही. ती गुणवत्ता यादी या निकालापासून सुरू करीत असल्याचे घोषित केले असते तर विद्यार्थी अधिक जोमाने अभ्यासाला लागले असते.

फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या आपल्या महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटांवर जातीच्या श्रेणीचा कॉलम छापण्यात आल्याने शिक्षण प्रेमींनी विरोध केला. त्यामुळे परीक्षा बोर्डाला विद्यार्थ्यांना नवीन हॉल तिकीट २३ जानेवारीपासून बोर्डाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध झाले आहे. त्याआधी १० जानेवारीपासून बोर्डाच्या संकेतस्थळावर हॉल तिकीट उपलब्ध झाल्याने त्यावर जातीच्या श्रेणीचा उल्लेख असल्याने विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक आणि शिक्षण प्रेमींच्या लक्षात आल्याने तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. तसेच या कॉलममुळे दलित वर्गातील विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागला असला तरी असे प्रकार पुढे होऊ नये म्हणून बोर्डाने योग्य ती खबरदारी घ्यावी. त्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन असणारे अभ्यासक परीक्षा बोर्डावर असणे आवश्यक आहे. तेव्हा असे प्रकार होतातच कसे याचा विचार व्हायला हवा. कारण परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण होणार नाही याची काळजी परीक्षा बोर्डाला घ्यावी लागते. त्यामुळे शिक्षण मंडळाने १८ जानेवारीला हॉल तिकिटावर असलेला जात कॉलम मागे घेत असल्याची घोषणा केली. कारण ११ फेब्रुवारी इयत्ता बारावी व २१ फेब्रुवारी इयत्ता दहा–वीची परीक्षा सुरू होत आहे. यापेक्षा अलीकडच्या काळात गुणवत्ता यादी बंद केली तरी ज्या शाळांचे निकाल १०० टक्के लागतील तसेच ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळतील त्यांचा विशेष सन्मान करण्यात येईल. तसेच आर्थिकदृष्ट्या गरीब व दिव्यांग असेल तर अशा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाचा खर्च बोर्ड करेल अशा प्रकारे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवणाऱ्या योजना सुरू करायला हव्यात.

विभागीय बोर्डाचे नाव, शाखा, विद्यार्थ्याचे नाव, विद्यार्थ्यांच्या आईचे नाव, जन्मतारीख, परीक्षा क्रमांक, केंद्राचे नाव, दिव्यांग, विषयाचा कोड नंबर, विषयांची नावे, उत्तरे लिहिण्याची भाषा, दिनांक आणि वेळ असे हॉल तिकिटावर ठळक अक्षरात लिहिलेले असते. त्यामुळे कोणता पेपर कोणत्या तारखेला व वेळेला आहे याची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना मिळाल्याने त्याप्रमाणे विद्यार्थी परीक्षेची तयारी करीत असतात. मात्र यावेळच्या हॉल तिकिटावर जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरली गेली, तर विविध सामाजिक संघटनांनी व्हॉट्सॲपच्या माध्यमातून जाहीर निषेध केला आहे. यासाठी परीक्षा बोर्डाने दक्ष राहणे गरजेचे आहे. कोणतेही निर्णय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने घेताना विद्यार्थ्यांचा ताण वाढणार नाही याची काळजी परीक्षा बोर्डाला घ्यावी लागेल. म्हणजे घेतलेला निर्णय रद्द करण्याची वेळ येणार नाही. असे बदल केल्याने विद्यार्थ्यांना मनस्ताप होतोच; परंतु पुन्हा खर्च सुद्धा वाढत असतो. त्या वाढणाऱ्या खर्चाला जबाबदार कोण? याचा विचार होणे आवश्यक आहे.

विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी एक लक्षात ठेवले पाहिजे की महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सर्वात प्रमुख कार्य म्हणजे इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा आयोजित करणे व त्यांचा निकाल वेळीच लावणे होय. अर्थात परीक्षा संपल्यावर ४५ दिवसांच्या आत निकाल लावण्यात यावा. यावेळी इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल १५ मेपर्यंत जाहीर होईल असे आपल्या राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी १७ जानेवारी रोजी पुणे दौ?्यावर असताना पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले. दहावी आणि बारावीच्या परीक्षा राज्यात विविध नऊ विभागीय मंडळामार्फत आयोजित केल्या जातात. यामध्ये पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नाशिक, अमरावती, लातूर, नागपूर कोल्हापूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांचा समावेश आहे. आता महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने राज्यातील बोर्डाने बारावी परीक्षेच्या हॉल तिकिटांमधून जात व प्रवर्गाचा उल्लेख मागे घेतला आहे. तेव्हा परीक्षेच्या काही दिवस अगोदर विद्यार्थ्यांचे मन दुखावले जाणार नाही? असा बदल परीक्षा मंडळाने घेऊ नये. तेव्हा फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये बसणा?्या विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटावरील जात प्रवर्गाचा केलेला उल्लेख परीक्षा मंडळाने रद्द केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचा ताणतणाव निर्माण न करता बिनधास्तपणे बोर्डाची परीक्षा द्यावी. तेव्हा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने परीक्षेच्या पूर्वी विद्यार्थ्यांना मनस्ताप होणार नाही असा कोणताही निर्णय घेऊ नये अशी राज्यातील शिक्षण प्रेमींची मागणी आहे.

**रवींद्र तांबे**

# स्वच्छ भारत अभियानाचा संकल्प ठेवून कचारगड यात्रेचे प्रशासनाने सुक्ष्म नियोजन करावे

## आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके, कचारगड यात्रा पुर्वतयारी आढावा




**गोंदिया :–** आदिवासी कुलदैवतेचे श्रध्दास्थान म्हणून कचारगड देवस्थान प्रसिध्द आहे. या ठिकाणी दरवर्षी फ रवरी माघ पौर्णिमेनिमित्त पाच दिवसाच्या गाव यात्रेचे आयोजन करण्यात येते. सदर यात्रेस मोठ्या प्रमाणात झारखंड, बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र व इतर राज्यातुन भाविक येथे येत असतात. यात्रेदरम्यान भाविकांची कुठलीही गैरसोय होणार नाही त्यादृष्टीने स्वच्छ भारत अभियानाचा संकल्प ठेवून कचारगड यात्रेचे प्रशासनाने सुक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी दिले.

सालेकसा तालुक्यातील कचारगड येथे १० ते १४ फ ेब्रुवारी २०२५ या कालावधीत यात्रा होणार आहे. या यात्रेच्या अनुषंगाने आज (ता.२७) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात मंत्री महोदयांनी पुर्वतयारी आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ.नामदेव किरसान, जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर, आमदार सर्वश्री डॉ.परिणय फुके, राजकुमार बडोले, संजय पुराम, गडचिरोली आमदार डॉ.मिलिंद नरोटे, माजी खासदार अश–ोक नेते, जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम, निव–ासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपविभागीय अधिकारी देवरी कविता गायकवाड, प्रकल्प अधिकारी देवरी उमेश काशिद, प्रकल्प अधिकारी भंडारा किरण मोरे, सालेकसा तहसिलदार नरसय्या कोंडागुर्ले, कचारगड यात्रा समितीचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद कोकोडे, कोसमतर्रा सरपंच सिंधू घरत यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

मंत्री डॉ.अशोक उईके म्हणाले, कचारगड यात्रेनिमित्त–ाने स्वच्छतेला विशेष प्राधान्या देण्यात यावे. पिण्याच्या पाण्याचा नियोजनबध्द कृती आराखडा तयार करुन रस्त्याच्या दोन्ही बाजुला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. भक्त निव–ासाची व्यवस्था करण्यात यावी. लाईटींगची व्यवस्था करतांनी अधिक समयसूचकतेने लाईट लावावे.

यात्रेदरम्यान वीज खंडीत होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. यात्रेत अनुचित प्रकार घडू नये यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणे आवश्यक आहे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य पथक तैनात करण्यात यावे. पोलीस विभागाने कायदा व सुव्यवस्थेचा चोख बंदोबस्त ठेवावा. कचारगड यात्रेत प्रत्येक भक्तांचा सन्मान झाला पाहिजे याची दक्षता घेण्यात यावी. पिण्याच्या पाण्याची प्रभावी व्यवस्था करावी. स्वच्छता उत्तम ठेवण्याकडे विशेष लक्ष द्यावे. कचारगड यात्रेची इतर राज्यातील भाविकांनी सुध्दा प्रेरणा घ्यावी असे आपल्या जिल्ह्याचे नावलौकीक करावे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविक जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी सांगितले की, यात्रेदरम्यान नियंत्रण कक्ष स्थापन करणे, रस्त्यातील खड्डे बुजविणे, विजेची अखंडीत सोय, भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य सुविधा, यात्रेदरम्यान १५ बसेसची व्यवस्था, नगर परिषद मोबाईल टॉयलेट, अग्नीशमन व्यवस्था, प्रत्येक ठिकाणी दिशादर्शक फलक लावण्याचे अंम लबजावणी यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहे. कचारगड देवस्थान येथून जवळच असलेल्या हाजराफ ॉल पर्यटन स्थळ येथे सुध्दा योग्य त्या सोई–सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत असे त्यांनी सांगितले. उपस्थितांचे आभार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी मानले.

# मुख्यमंत्र्यांच्या कृती कार्यक्रमांतर्गत माहिती संचालक डॉ.गणेश मुळे यांनी साधला माध्यमांशी संवाद

**गोंदिया :–** शासकीय योजनांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांना मिळावा यासाठी राज्य शासनाच्या वतीने १०० दिवसाचा कृती कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने आज नागपूर–अमरावती विभागाचे माहिती संचालक डॉ.गणेश मुळे यांनी गोंदिया जिल्हा माहिती कार्यालयाला भेट देवून माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला.



शासनाच्या योजना जनसाम ान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पत्रकारांची भूमिका महत्वाची असून शासनाच्या या उपक्रमाला प्रसारमाध्यमांनी व्यापक प्रसिध्दी देऊन सर्वतोपरी सहकार्य करावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र सरकारने राज्याच्या भविष्यातील विकासाचा रोडमॅप तयार केला असून विविध विभागांसाठी पहिल्या १०० दिवसांचा आराखडा तयार केला आहे. तसेच नागरिकांना जलदगतीने आणि वेळेत शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी शासकीय विभागांनी सात कलमी कृती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य सरकारतर्फे राबविण्यात येणारी ही शासकीय ध्येयधोरणे तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रसारमाध्यम हे प्रभावी साधन आहे. त्यामुळे शासनाच्या ध्येयधोरणांना प्रसारम ाध्यमांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी, असे आवाहन नागपूर–अमरा–वती विभागाचे माहिती संचालक डॉ.गणेश मुळे यांनी केले. जिल्हा माहिती कार्यालय गोंदिया येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधतांना ते बोलत होते.

डॉ.गणेश मुळे म्हणाले, राज्य सरकारने अनेक विकासकामे होती घेतली आहेत. सामान्य लोकांना शासनाच्या सेवा वेळेत आणि तत्परतेने मिळाव्यात यासाठी देखील पाऊले उचलली आहेत. सदर योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. पहिल्या १०० दिवसात नागपूर विभागात सुध्दा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे आराखडा तयार करण्यात आला आहे.

यात विदर्भातील संपूर्ण ११ जिल्ह्यांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. कृत्रिम बुध्दीमत्तेचा (आर्टिफिशल इंटलिजन्स) वापर करुन अधिक जलद गतीने नागरिकांपर्यंत पोहचण्याचा आमचा मानस आहे. त्यासाठी प्रसारमाध्यमात कार्यरत असणाऱ्या पत्रकारांसाठी आर्टिफि शल इंटलिजन्सचे प्रशिक्षण सुध्दा घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटूडे, उपसंपादक कैलाश गजभिये, पत्रकार सर्वश्री खेमेंद्र कटरे, ,चंद्रकांत खंडेलवाल, अतुल दुबे, जयंत शुक्ला, संजय राऊत, रवि सपाटे, दिनेश भगत उपस्थित होते. उपस्थितांचे आभार जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटूडे यांनी मानले.

# सौंदड ग्रामीण रुग्णालय इमारतीची आमदार बडोलेनी केली पाहणी



**सडक अर्जुनी:–** येथील नव्याने बांधण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालय इमारतीची पाहणी आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी केली. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा पुरवण्यासाठी ही इमारत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

पाहणी दरम्यान रुग्णालयाच्या बांधकामाची गुणवत्ता, सोयी–सुविधा आणि परिसराच्या व्यवस्थेची तप–ासणी करण्यात आली. आमदार बडोलेनी संबंधित अधिकाऱ्यांना वेळेत उर्वरित कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी रुग्णालयामध्ये उपलब्ध होणाऱ्या सेवांबाबत माहिती दिली. आमदार बडोले यांनी रुग्णालय कार्यान्वित होण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या पाहणी प्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अमरीश मोहबे, पंचायत समिती सभापती चेतन वळगाये, उपसभापती निशाताई काशीवार, जिल्हा परिषद सदस्य निशाताई तोडासे, कृ.उ.बा.स. सभापती डॉ. अविनाश काशीवार, पंचायत समिती सदस्य वर्षाताई शहारे, माजी जिल्हा परिषद सदस्य रमेश चुर्हे, प्रभुदास लोहीया, उपअभियंता पवन फुंडे, महीलाध्यक्ष रजनीताई गिऱ्हिपुजे, सदुजी विठ्ठले, संदीप मोदी, चरणदास शहारे, ओम कार टेंभुर्णे, पुरुषोत्तम निंबेकर, शुभम जनबंधु, दिव्या बनकर यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# स्पर्श कुष्ठरोग जनजागृतीसाठी गोंदियावासी धावणार गुरुवारी

**गोंदिया :–** केंद्र व राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दि.२६ जानेवारी ते ३० जानेवारी २०२५ या कालावधीत जिल्ह्यात "स्पर्श" कुष्ठरोग जनजागृती अभियान तसेच कुष्ठरोग शोध मोहीम अभियान दि.३१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२५ दरम्यान राबविण्यात येत आहे. या दोन्ही मोहीमेत जनजागृती व सर्वेक्षणावर विशेष भर देण्यात येत आहे. अभियाना दरम्यान नागरिकांनी कुष्ठरुग्ण आजाराबाबत गैरसमज व भिती न ठेवता आपल्याला होणारा त्रास न लपवता घरी येणाऱ्या पथकाला सहकार्य करावे. कुष्ठरुग्णांसोबत समाजात भेदभाव न होता सन्मानाने जगण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करावे.दि.३० जानेवारी रोजी जागतिक कुष्ठरोग निवारण दिनानिम ीत्त कुष्ठरोग जनजागृती साठी जिल्हास्तरीय खुली मॅरेथॉन स्पर्धा राबविण्यात येणार आहे. कुष्ठरोग जनजागृती साठी जास्तीत जास्त नवयुवकांनी मॅरेथॉन मध्ये भाग घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी गोंदियावासियांना केले आहे.




मॅरेथॉन दि.३० जानेवारी वार गुरुवारी सकाळी ७.३० वाजता प्रशासकीय ईमारत जयस्तंभ चौक येथून सुरुवात होणार असून तिचा मार्ग जयस्तंभ चौक–फुलचुर नाका–सारस चौक मार्गे परत सारस चौक–फुलचुर नाका–जयस्तंभ चौक येथे समापन होणार आहे. तरी गोंदियावासी यांनी जास्तीत जास्त संख्येने कुष्ठरोग जनजागृती मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी होऊन कुष्ठरोग आजाराला हरवण्यासाठी आरोग्य विभागाला साथ देण्याचे आवाहन सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.म हेंद्र धनविजय यांनी केले आहे.रन फॉर लेप्रेसी ही खुली मॅरेथॉन स्पर्धा असुन पुरुष ५ कि.मी. व महिला ३ कि.मी. साठी राहणार आहे.पुरुष व महिला गटाच्या प्रत्येकी प्रथम पारितोषिक रु.४०००/–, व्दितीय पारितोषिक रु.२५००/– तर तृतीय पारितोषिक रु.१५००/– दिले जाणार असल्याची माहीती डॉ.महेंद्र धनविजय यांनी दिली आहे. विजेत्यांना प्रमाणपत्र सुद्धा दिले जाणार आहे.नोंदणीसाठी सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) यांचे कार्यालय पत्ता प्रशासकीय ईमारत किंवा निरज धर्मकार म ो.न.८७८८७५९५४०, दिनेश बंसोड मो.न.८६६९१३९०६३, अनिल पडोळे मो.न. ९३७०१६२१५९ यांच्याशी दि.२९ जानेवारी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सपंर्क साधण्याचे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ.भाग्यश्री गावंडे यांनी केले आहे.स्पर्धकांनी सोबत आधार कार्ड व बँक पासबुक ची झेरॉक्स सोबत आणणे गरजेचे आहे.

# फ़सव्या संदेशाला बळी पडू नका; अन्यथा बँक खाते होईल रिकामे

नागपूर, जानेवारी २०२५: अनोळखी क्रमांकावरून वीजबिल भरण्यासंदर्भातील येणाऱ्या फ़सव्या संदेशाला बळी पडू नये आणि वीज ग्राहकांना लुटणाऱ्या सायबर स्कॅमरपासून सावध राहण्याचे आवाहन महावितरणतर्फ़े करण्यात आले आहे. महावितरणने कंपनीच्या वेबसाईटवर तसेच महावितरणच्या ॲपवर फेक मेसेजद्वारे होणारी फसवणूक कशी रोखता येईल याची विस्तृत माहिती दिली आहे.

तुमचे वीज बिल अपडेट नसल्याच्या कारणावरून आज रात्री वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. याकरिता ताबडतोब सोबत दिलेल्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा, असे बनावट मेसेज नागरिकांना पाठविण्यात येत आहेत. एखाद्या ग्राहकाने संपर्क साधला तर वीज बिल भरण्यासाठी वैयक्तिक मोबाइल क्रमांकावरून ऑनलाइन पेमेंटसाठी बनावट लिंक पाठवून ग्राहकांना सॉफ्टवेअर डाउनलोड करण्यास सांगितले जाते. त्यास प्रतिसाद दिल्यास मोबाइल किंवा संगणक हॅक करून बँक खात्यातील रक्कम लंपास होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी अशा बनावट मेसेजकडे पूर्णपणे दुर्लक्ष करावे, असे आ–वाहन महावितरणतर्फ़े करण्यात आले आहे. महावितरणकडून केवळ मोबाइल क्रमांकाची नोंदणी केलेल्या वीजग्राहकांनाच सिस्टमद्वारे पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्ती, तांत्रिक किंवा अन्य कारणांमुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास तो पूर्ववत होण्यास लागणारा संभाव्य कालावधी तसेच दरमहा वीजबिलांची रक्कम, स्वतःहून मीटर रीडिंग पाठविण्याचे ग्राहकांना आवाहन, मीटर रीडिंग घेतल्याची तारीख व वापर केलेली एकूण युनिट संख्या, वीजबिलाची रक्कम देय दिनांक, वीजपुरवठा खंडित करण्याची रीतसर नोटीस आदींची माहिती एसएम एसद्वारे पाठविण्यात येते. तसेच अधिकृत मेसेजमधून वीजग्राहकांना किंवा नागरिकांना महावितरणच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या वैयक्तिक मोबाइलवर संपर्क करण्याबाबत कळवत नाही. वीज बिलाबाबत काही शंका व तक्रारी असल्यास किंवा याबाबत काही एसएमएस आल्यास वीजग्राहकांनी २४ तास सुरु असलेल्या टोल फ्री क्रमांक किया नजीकच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहन महावितरणतर्फ़े करण्यात आले आहे.

# जि.प.उपाध्यक्ष हर्षेंचा जि.प.कर्मचारी महासंघ व ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने केला सत्कार



**गोंदियाः–** गोंदिया जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांचा जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ पतसंस्था व ग्राम पंचायत अधिकारी संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला.श्री हर्षे यांचे पुष्पगुच्छ संस्था कालदर्शिका व डायरी देऊन जिल्हा परिषद महासंघ, ग्राम पंचायत अधिकारी संघटना व जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था मार्फत संयुक्तरित्या कर्मचारी पदाधिकार्यांच्या मार्फत शुभेच्छा देण्यात आले.

याप्रसंगी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. उपाध्यक्ष हर्षे यांच्याशी ग्रामीण विकास साधणे संदर्भात विविध अडीअडचणी व उपाय योजनांवर ग्रामपंचायत अधिकारी संघटन जिल्हाध्यक्ष कम लेश बिसेन यांच्यासोबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी शिष्टमंडळात महासंघ सरचिटणीस संतोष तोमर, ग्राम पंचायत अधिकारी संघटना जिल्हाध्यक्ष तथा पतसंस्था सचिव कमलेश बिसेन, महासंघ कार्याध्यक्ष सौरभ अग्रवाल, उपाध्यक्ष चित्रा ठेंगरी, सुभाष खत्री, संतोष तुरकर, अश्विनी चेटूले, भगीरथ नेवारे, नंदलाल कावळे, जैन इत्यादी कम ‘चारी पदाधिकारी उपस्थित होते.

# आमदार बडोले यांचे जनसंपर्क कार्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



**सडक/अर्जुनी:–** प्रजासत्ताक दिनाचा ७५ वा वर्धापनदिन अर्जुनी मोर विधानसभेचे आमदार ईजी.राजकुमार बडोले यांचे सडक / अर्जुनी येथील जनसंपर्क कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम राष्टपिता महात्मा गांधी, भारतिय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतीमेला माल्यार्पण करून आमदार ईजी.राजकुमार बडोले यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. २६ जानेवारी १९५० रोजी नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारत देशाने संविधानाचा स्वीकार करून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. लोकशाही म्हणजे लोकांचे लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य, २६ जानेवारी या दिवसापासून भारतीय जनतेला राज्य चालविण्याचा अधिकार मिळाला, अशी माहिती यावेळी आमदार राजकुमार बडोले यांनी उपस्थितांना दिली.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष लक्ष्मीकांत धानगाये, राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉ. अविनाश काशिवार, माजी सभापती अशोक लंजे, जिल्हा सचिव शेषराव गिरीपुंजे, माजी जिल्हा परिषद सदस्य मिलन राऊत, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकलाताई डोंगरवार, माजी सभापती गिरधारी हत्तीमारे, जागेश्वर पातोडे, लोकचंद कापगते, हितेश डोंगरे, राजेश कठाने, विलास बागडकर, शितल गौर, राजेश शहारे, ताराबाई मडावी ,बोरकर ताई, उमेश पंधरे, प्रशांत शहारे, विलास कापगते ,मोहसीन सोनवाणे, सोनू भेंडारकर, प्रतिश शेंडे, जगदीश सरनागत, तथा भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस तथा महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# मोहाडी येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रथम कन्या प्राप्त पालकाचे व जेष्ठ नागरिकांचे सत्कार

**गोरेगाव:–** :तालुक्यातील मोहाडी ग्रांम पंचायत येथे २६ जानेवारी ला प्रजासत्ताक दिनानिमि त्त ध्वजारोहण व बेटी बचाव अभियान अंतर्गत मुलीच्या जन्मावर तिच्या आईला रोख ११०० व शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. व गावातील ७५ वर्षांवरील सर्व जेष्ठ नागरिकाचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रम ाचे अध्यक्ष सेवानिवृत्त प्राचार्य तथा आजिवन प्रचारक गुरुदेव सेवा म ंडळाचे प्रा रूपलाल कावडे होते. तर ध्वजारोहण मोहाडी ग्रांम पंचायत चे सरपंच नरेंद्र कुमार चौरागडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मोहाडी ग्रांम पंचायत उपसरपंच मोहनलाल पटले, माजी सरपंच मदनलाल बघेले,माजी सरपंच धुर्वराज पटले, तंन्टामुक्त गांव समितीचे अध्यक्ष लिखीराम बघेले, पोलिस पाटील राजेश येळे,जी ई एस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय चे प्राचार्य राजेंद्र रहमतकर, जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सी.के.बिसेन, सेवानिवृत्त म ुख्याध्यापक जे.जे.पटले, सेवानिवृत्त शिक्षक वाय.एफ.पटले, सेवानिवृत्त पोस्टमास्तर हिरालाल महाजन, सेवानिवृत्त प्राचार्य डी.आर.चौरागडे, ग्रांम पंचायतचे सदस्य भिवराज शेंन्डे, योगराज भोयर, खेमराज वाकले, पुस्तकला पटले,चंन्द्रकांता पटले, पुजा डोहळे, नेहा उके, प्रभा पंधरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक ए.के.वंजारी, सेवानिवृत्त म ुख्याध्यापक एन.के.बिसेन, प्रमानंद तिरेले, कमलेश पटले, माजी सैनिक कुवरलाल चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते




यावेळी ग्रांम पंचायतचे सरपंच नरेंद्र कुमार चौरागडे यांनी सांगितले की मुलगा म्हणजे वंशाचा दिवा आहे एक तरी मुलगा पाहिजे अशी मानसिकता समाजात रूजलेली होती. मात्र या मानसिकतेत बदल करण्यासाठी मोहाडी ग्रांम पंचायतने पुढाकार घेत गावात मुलीच्या जन्मावर तिच्या आईला रोख ११०० व शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे गावातील ७५ वर्षांवरील सर्व नागरिकांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. जेष्ठ नागरिकाचे सत्कार हे मोहाडी ग्रांम पंचायत च्या इतिहासात प्रथमच होत आहे. जेष्ठ नागरिकाना मान, सन्मान देऊन सत्कार करित आहे जेष्ठ नागरिक म्हणजे आज समाजात असलेले अनुभवाचे साधन व खजिना आहे. आज समाजात जेष्ठ नागरिकाना सम ाजात विशेष मान सन्मान आहे अशा सर्व जेष्ठ नागरिकाचे अनुभावातुन आपल्या ग्रांम पंचायतला विशेष फायदा च होणार आहे. व सर्व जेष्ठ नागरिकाचा सर्वांनी सन्मान करावा व जेष्ठ नागरिकानी सुध्दा आपले मान सन्मान राखुन आ–पले सन्मान विशेषित ठेवावे ग्रांम पंचायत मोहाडी सर्व जेष्ठ नागरिक सोबत राहून आपण सुचवलेल्या सर्व विकासात्मक कामे पूर्ण करणार आपल्या मागणी पूर्णता सहकार्य करून ग्रांम पंचायत सुध्दा आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहे. असे आपले सहकार्य लाभावे असे प्रतिपादन सरपंच नरेंद्र कुमार चौरागडे यांनी केले.

यावेळी गावातील १०० च्या जवळपास जेष्ठ नागरिकाचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी गावातील नागरिक महिला पुरूष विध्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. संचालन डी.पी.डावखरे सर तर आभार प्रदर्शन उपसरपंच मोहन–लाल पटले यांनी केले.

# शिक्षणाचे आर्थिक कुपोषण थांबवा-शरद जावडेकर

## शिक्षण हक्क व संविधान परिषद उत्साहात




**गोंदिया :-** इतर प्रगत देशांच्या तुलनेत भारतीय शैक्षणिक गुंतवणूक अतिशय कमी म्हणजे अडीच टक्के आहे. तेव्हा शिक्षणाचे आर्थिक कुपोषण सरकारने थांबविले पाहिजे असे आवाहन पुणेचे शिक्षण बचाव समन्वय समितीचे अध्यक्ष शरद जावडेकर यांनी (ता. २५) केले.येथील जैन कुशल भवन येथे दोन दिवसीय आयोजित शिक्षण हक्क व संविधान परिषदेच्या प्रथम सत्रात अध्यक्ष पदावरून श्री जावडेकर बोलत होते. मंचावर कार्यक्रमाचे उदघाटक आणि अर्थतज्ज्ञ श्रीनिवास खांदेवाले, डॉ. संतोष सुरडकर, वसंतराव गवळी उपस्थित होते.

श्री जावडेकर पुढे बोलताना म्हणाले की, राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात शिक्षणावर किती खर्च व्हावं यावर विचार होणे गरजेचे आहे. त्यांनी भारतीय संविधानाची जोरदार प्रशंसा केली ते म्हणाले,मनुस्मृतीचे संविधान नाकारून स्वातंत्र्य, समता, न्याय बंधुभाव, तसेच धर्मनिरपेक्ष आणि विज्ञाननिष्ठ संविधान लागू झालं. शिक्षणाची रचना कशी असावी याचं उत्तर याच संविधानात सामावलं आहे.समान संधी असेल तरच समता निर्माण होईल परंतु राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून अंधश्रद्धा निर्माण करणारी शैक्षणिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. यावर त्यांनी चिंता व्यक्त केली. जिकडे तिकडे दहशतीचं वातावरण असतांना गोंदियात शिक्षण परिषद आयोजित करण्यात आल्याने आयोजकांचे त्यांनी कौतुक केले.


याप्रसंगी उदघाटक श्री खांदेवाले यांनीही विचार मांडले, ते म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्वी देशात साम्राज्यशाही होती. ही संपूस्टात येऊन लोकशाही नांदावी यासाठीच भारतीय संविधान लिहिण्यात आलं. या देशात सरकारची भूमिका कशी असावी यासाठी संविधानात नितिनिर्देशक तत्वे नमूद असून हे तत्व विचारात घेऊन सरकारने पाऊल उचलले पाहिजे. डॉ सुरडकर म्हणाले की, सत्ताधारिवर्ग भांडवलशाही वाढवत आहे. यामुळे भारताची लोकशाही शैवाळ सारखी झाली आहे. तीला पाळेमुळे नाहीत. पारंपरिक भांडवलदार वर्ग भारतात असल्यामुळे परिवर्तन होऊ शकला नाही. त्यामुळे भारतीय समाजाला शिक्षण नाकारण्यात आलं. हा वर्ग बदलणे आवश्यक होतं. कारण हा जातीवर्ग समता सूचक नसून विषमतावादी आहे. आपण डोळस पणे न पाहता जाती आधारित कृती करू लागलो.त्यामुळे समाजाचं मोठं नुकसान झालं,असे ते म्हणाले

संविधानाच्या उद्देशीकेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. संविधान जागृती अभियान अंतर्गत शिक्षण बचाव शाळा बचाव मोहीम राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाचे संचालन ॲड.नरेश शेंडे यांनी तर आभार प्रा. डॉ. दिशा गेडाम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोंदिया जिल्हा शिक्षण बचाव समन्वय समिती चे अध्यक्ष वसंतराव गवळी, समन्वयक आदेश गणवीर, संयोजक अतुल सतदेवे, सर्व समाज विचार मंच आणि तालुका समन्वयक यांनी सहकार्य केले.

# कुटुंबनियोजनाची जबाबदारी महिलांचीच का? नसबंदीला पुरुषांचा नकार!

**गोंदिया :-** वाढत्या लोकसंख्येवर आळा घालण्यासाठी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केल्या जातात; परंतु जिल्ह्यात कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करण्याचे महिलांचे प्रमाण यंदा कमी, तर पुरुषांचे प्रमाण दिलेल्या उद्दिष्टापेक्षा अधिक आहे.

नसबंदी करायला महिला पुढे येतात. तसेच आता पुरुष मंडळीही नसबंदीसाठी पुढे येत आहेत. कमजोरी येईल असा असलेला गैरसमज दूर झाल्याने आता पुरुषही नसबंदी करायला पुढे येत आहेत. आता वाढत्या लोकसंख्येमुळे शासन कुटुंबनियोजनावर भर देत आहे; परंतु वाढत्या महागाईमुळे मुलांचे योग्य शिक्षण व त्यांचा राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी जास्त मुले होऊ नयेत असा आग्रह आता पालकांचा असतो.




त्यामुळे मआम्ही दोन, आमचे दोनफ ही संकल्पना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राबविली जात आहे. काहींनी तर एकच मुलगा किंवा मुलीवर शस्त्रक्रिया करून कुटुंबनियोजन केले आहे.

अधिक मुलांचे संगोपन करणे आजघडीला कठीण असल्याचे लक्षात घेत कमी अपत्यांवरच कुटुंबनियोजन करण्याचे ठरविले जात आहेत; परंतु कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करताना महिलांनाच पुढे केले जात होते. पुरुष मंडळी समोर येत नव्हती; मात्र आता पुरुष मंडळीही नसबंदी करण्यासाठी पुढे येत आहेत.

### ८७१० उद्दिष्ट शस्त्रक्रियांचे

**पुरुष शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट ५१०, तर स्त्री कुटुंबनियोजन शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट आठ हजार २०० आहे. असे एकूण आठ हजार ७१० शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट आहे.**

### ३५३७ महिला, पुरुष केवळ ३०६

**नसबंदी केल्यानंतर पुरुषांमध्ये कमजोरी येते असा गैरसमज होता; परंतु हळूहळू हा गैरसमज दूर होत आहे. दिलेल्या उद्दिष्टापेक्षा अधिक पुरुषांच्या शस्त्रक्रिया जिल्ह्यात होत आहेत. ३५३७ महिलांनी, तर ३०६ पुरुषांनी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केल्या आहेत.**

### एक दिवसाचा आराम पुरेसा

**स्त्री-पुरुष समानता असताना फक्त कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया स्त्रीने न करता पुरुषांनीही जास्त सहभाग घेऊन करावी. पुरुष नसबंदी सोपी व विनात्रास असणारी पद्धत असून कमी वेळेत व स्त्रीच्या तुलनेने कमी जोखमेची पद्धत आहे. शस्त्रक्रियेनंतर पुरुषांना एक दिवसाचा आराम पुरेसा आहे.**

**"टाक्याची शस्त्रक्रिया ही चांगली असते. बिनटाका शस्त्रक्रिया असफल होऊ शकते. पुरुष नसबंदीमध्ये पुरुषांना वाटते की माझी लैंगिक शक्ती कमी होईल किंवा मला शारीरिकदृष्ट्या कमजोरी येईल अथवा शारीरिक संबंध ठेवण्यास काही अडथळा येईल. अशा काही भ्रामक कल्पनांमुळे पुरुषवर्ग शस्त्रक्रिया करण्यास पुढे येत नाही. पुरुषांनी शस्त्रक्रियेसाठी पुढे यावे."**
**- डॉ. नितीन वानखेडे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. गोंदिया.**

### केवळ ३८४३ शस्त्रक्रिया

**महिला कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया मोठ्या प्रमाणात करतात. जिल्ह्यात वर्ष २०२४-२५ या वर्षात तीन हजार ५३७ महिला व ३०६ पुरुषांनी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केल्या आहेत.**

### पुरुषांची नसबंदी अगदी सोपी पुरुष नसबंदी

**या शस्त्रक्रियेत दोन्ही बाजूंच्या वीर्यनलिका कापून बांधल्या जातात. अंडकोशाच्या वरच्या भागात लहान छेद घेऊन ही नस बाहेर काढतात. ही शस्त्रक्रिया स्थानिक भूल देऊन प्राथमिक आरोग्य केंद्रातसुद्धा करता येते. पुरुष नसबंदी करताना विशिष्ट पद्धतीचा चिमटा वापरून ऑपरेशन करतात. त्यामुळे वीर्यामध्ये शुक्रतंतू मिसळणे प्रक्रिया थांबते.**

# गरज ४२५ जणांची, कार्यरत १४५ ; रिक्त पदे केव्हा भरणार?

**गोंदिया :** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ४२५ अधिपरिचारिका व परिसेविकांची पदे मंजूर आहेत. पण, केवळ १४५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे ४५ रुग्णांच्या सुश्रूषेसाठी केवळ एक स्टाफ नर्स कार्यरत आहे. परिणामी, कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ५१० खाटा उपलब्ध आहेत. या रुग्णालयात गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली जिल्ह्यासह मध्य प्रदेश आणि छत्तीसगड जिल्ह्यातील रुग्ण देखील उपचाराकरिता येत आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असल्यामुळे चांगल्या सुविधा मिळतील, या आशेने गोरगरीब रुग्ण येथे उपचारासाठी येतात. परंतु, रुग्णालयात उपचारासाठी आल्यानंतर बऱ्याच रुग्णांना निराश होऊन परतावे लागते. या ५१० खाटांच्या रुग्णालयात ३७५ अधिपरिचारिका आणि ५० परिसेविकांची पदे मंजूर आहेत. त्यांपैकी अधिपरिचारिकांची १२९ तर १६ परिसेविकांची पदे भरण्यात आली आहेत. यातील ७४ अधिपरिचारिका केटीएस रुग्णालयात, तर ४५ कर्मचारी बाई गंगाबाई रुग्णालयात कार्यरत आहेत. त्यामुळे रुग्णसेवा करताना कर्मचाऱ्यांच्या नाकी नऊ येत आहे. ४५ रुग्णांचा भार एका स्टाफला सांभाळावा लागत आहे.




### हाफकिनचा औषध पुरवठा ठरतोय डोकेदुखी

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात २० टक्के औषधसाठा शासनाने नेमून दिलेल्या मुंबई येथील हाफकिन या संस्थेकडून पुरविण्यात येतो. मात्र, नेहमीच औषधसाठा वेळेत आणि नियमित पुरविण्यात येत नाही. परिणामी रुग्णांना पाहिजे तो उपचार मिळू शकत नाही. यासंदर्भात वैद्यकीय महाविद्यालयाने अनेकदा पत्रव्यवहार केला आहे.**

# गोंदियातून दुपारी लोकलगाडी सुरू करा



**गोंदिया:-** दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागातील २०२४-२५ आणि २०२५-२६ या वर्षासाठी विभागीय रेल्वे ग्राहक सल्लागार समितीची बैठक १६ जानेवारी रोजी विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या अध्यक्षतेत पार पडली. या बैठकीत डीआरयूसीसी सदस्यांनी रेल्वे समस्यांचा मुद्दा उपस्थित करत गोंदिया-नागपूर ही दुपारच्या सुमारास धावणारी लोकल रेल्वेगाडी सुरू करण्याची मागणी केली.

बैठकीत नैनपूर येथे नॅरोगेज काळानुसार सध्याच्या प्रवासी गाड्यांचे संचालन, दिव्यांगांसाठी बॅटरी युक्त मोबाईल वाहन व्यवस्था, एक्सप्रेस रेल्वेगाडीनुसार फलाटांचा विस्तार, गोंदियाच्या फलाट क्रमांक ६ वर कोच डिस्प्ले, नागपूर-इंदोर वंदे भारतची कनेक्टीविटी नागपूर-बिलासपूर वंदे भारतला देण्यासाठी नागपूर-बिलासपूर वंदे भारतच्या वेळेत बदल करणे, बालाघाट येथील नैनपूरकडे जाणाऱ्या फलाटावर ॲक्सिलेटर, कामठी रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी लिफ्ट, २२१७३/७४ चंदाफोर्ट-जबलपूर (इंटरसिटी) ला वडसा आणि सौंदड स्थानकावर थांबा देणे, १२२५१/५२ यशवंतपूर-कोरबा वैनगंगा एक्सप्रेसला सौंदड, नागभीड आणि मूल स्थानकावर थांबा, डोंगरगड रेल्वेस्थानकावर २०८४३/४४, २०८४५/४६, १२८५१/५२, १२८४९/५०, १२७७१/७२ या रेल्वेगाड्यांचा नियमीत थांबा, १२०६९/७० जनशताब्दी व रायपूरकडे जाणाऱ्या इतर गाड्यांचा आमगाव रेल्वेस्थानकावर थांबा, छिंदवाडा येथून रात्री १०.३० वाजता सुटणारी १९३४४ छिंदवाडा-इंदूरमध्ये अतिरिक्त दोन २ एसी, आणि तीन ३ एसी कोचची व्यवस्था, गोंदियामार्गे जबलपूर-रायपूर ट्रेन सुरू करणे, गोंदिया स्थानकावर २४ तास ॲलोपॅथी डॉक्टर आणि रुग्णवाहिका व्यवस्था, सकाळीच्या सुमारास गोंदिया-रायपूर आणि दुपारी गोंदिया-नागपूर लोकल सुरु करणे, चांदाफोर्ट-गोंदिया मार्गावरील गाड्यांचे परिचलन निर्धारीत वेळेत करणे, वडसा हे गडचिरोली जिल्ह्यातील एकमेव रेल्वेस्थानक असल्याने या मार्गावर धावणाऱ्या जास्तीत जास्त गाड्यांना थांबा देणे आदी सुचना बैठकीत देण्यात आल्या.

यावेळी दीपककुमार गुप्ता यांनी सर्व सूचनांवर तातडीने कार्यवाही करून प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे व विकासकामे व प्रवाशांच्या सुविधांना प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले.

# उद्योग क्षेत्राला अच्छे दिन केव्हा?

## १०० दिवसाच्या ॲक्शन प्लॅनकडे लक्ष : उद्योगाला घेवून शासन-प्रशासन उदासीन

### गोंदिया औद्योगिक विकास क्षेत्र

**एकूण भुखंड - २०५, वाटप १८१, भुखंड शिल्लक - २४**
**कार्यरत घटक - १०५, वाटप व प्रगती नसलेले घटक - २२**

### देवरी औद्योगिक विकास क्षेत्र

**एकूण भुखंड - १ २५, वाटप ११७, भुखंड शिल्लक - ८**
**कार्यरत घटक - १४, वाटप व प्रगती नसलेले घटक ९१**

### तिरोडा औद्योगिक विकास क्षेत्र

**एकूण भुखंड - २, वाटप - २**
**अदानी पॉवर प्लांट**

### अतिरिक्त तिरोडा औद्योगिक विकास क्षेत्र

**एकूण भुखंड १०, वाटप - १०**
**एकूण भुखंड - २६, वाटप - २६,**
**कार्यरत घटक - ६, वाटप व प्रगती नसलेले घटक - १४**

### अर्जुनी मोरगाव औद्योगिक विकास क्षेत्र

**एकूण भुखंड - ५१, वाटप १२, शिल्लक भुखंड - ३९**
**कार्यरत घटक - ०, वाटप व प्रगती नसलेले घटक - १०**

**गोंदिया :-** गोंदिया जिल्हा राज्याच्या टोकावरचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात औद्योगिक क्रांतीचा पायंडा रचण्यात आला. मात्र तो पायंडा औद्योगिक विकास महामंडळ आणि शासनाच्या नातर्केपणामुळे कुचकामी ठरू लागला आहे. जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्र उभारणी झाली असली तरी अद्यापही हव्या तेवढ्या प्रमाणात उद्योग उभे करण्यात यश आले नाही. परिणामी रोजगाराची दारे बंद पडली आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील कुशल अकुशल कामगार रोजगारासाठी परजिल्ह्यात पलायन करीत आहेत. एवढेच नव्हेतर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या शोधात भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्याच्या १०० दिवसाच्या ॲक्शन प्लॅनवर औद्योगिक विकास महामंडळ आपल्या कामगिरीचा परिचय देत उद्योग क्षेत्राला अच्छे दिन आणणार काय? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.




गोंदिया जिल्हा राज्याच्या टोकावरचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात प्रामुख्याने शेती व्यवसाय केला जातो. एवढेच नव्हेतर जिल्हा वनसंपदेने नटलेला आहे. मात्र औद्योगिक विकास, पर्यटन विकास आणि त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या दृष्टीकोनातून अद्यापपर्यंत ठोस पाऊल उचलण्यात आले नाही. म्हणून गोंदिया जिल्हा औद्योगिक दृष्ट्या प्रगत जिल्ह्याच्या गणनेत कोसोदूर आहे. जिल्ह्यात औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी खा. प्रफुल पटेल यांच्याशिवाय कोणत्याही पुढाऱ्याने अद्यापही पाऊल उचलले नाही. त्यामुळे येथील औद्योगिक विकास क्षेत्र फलकापुरतेच ठरू लागले आहे. औद्योगिक क्षेत्रातील भुखंड वाटप झाले असले तरी भुखंडावर मोठे उद्योग उभारण्यात आले नाही. भुखंड बळकाविण्याशिवाय दुसरे कोणतेही काम पुढे सरकले नाही. त्याचबरोबर आद्योगिक क्षेत्रामध्ये असलेले जुने उद्योगही आजघडीला बंद पडले आहेत. यामुळे गोंदिया जिल्ह्यातील आद्योगिक विकास क्षेत्र नावापुरताच ठरू लागल्याने या क्षेत्राला अच्छे दिन केव्हा येणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व विभागाला १०० दिवसांचे ॲक्शन प्लॅन आखून त्यानुरूप कामगिरी करण्याच्या सुचना केल्या आहेत. यानुसार गोंदिया जिल्ह्यात औद्योगिक विकास महामंडळाकडून कोणती कामगिरी करण्यात येणार? हेही पाहण्यासारखे राहणार आहे.

### अग्रीस्टॅकफद्वारे शेतकऱ्यांना "युनिक फार्मर आयडी'

**भंडारा :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांना येत्या काळात युनिक फार्मर आयडी मिळणार आहे. शेतकऱ्याचा आधार क्रमांक जोडून त्यास अद्वितीय शेतकरी ओळख क्रमांक मिळणार आहे. एग्रीस्टॅक उपक्रमाच्या माध्यमातून ही संकल्पना प्रत्यक्षात उतरणार आहे.

देशातील प्रत्येक नागरिकाचा वेगळा आधार आयडी (क्रमांक) आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याचा एक युनिक फार्मर आयडी तयार केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी एग्रीस्टॅक योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या यूनिक फार्मर आयडी आणि त्यांच्या शेतजमिनीला जोडण्याची ( लिंक करण्याची ) मोहीम सुरू करण्यात येणार आहे.

भविष्यात शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ याच युनिक फार्मर आयडी च्या माध्यमातून मिळणार आहे. येत्या काही दिवसात महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने शेतकऱ्यांनी युनिक फार्मर आयडी तयार करून घेण्यात येणार आहे.

# बिरसी विमानतळावर घडले ४५० पायलट

## आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ : १५ वर्षांपासून सुरु आहे प्रशिक्षण केंद्र

**गोंदिया :-** तालुक्यातील बिरसी येथील विमानतळावर इंदिरा गांधी राष्ट्रीय उडान अकादमी रायबरेलीचे पायलट प्रशिक्षण केंद्र आहे. या प्रशिक्षण केंद्राला १५ वर्ष पूर्ण झाली असून, या कालावधीत ४५० पायलट तयार झाले आहेत. पायलट प्रशिक्षणासाठी हे विमानतळ महत्त्वपूर्ण ठरत आहे. तालुक्यातील बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ आहे. या ठिकाणी विमानांना उड्डाण घेण्यास अनुकूल वातावरण असल्याने रायबरेली येथील इंदिरा गांधी राष्ट्रीय उडान अकादमीने येथे १५ वर्षापूर्वी पायलट प्रशिक्षण केंद्र सुरू केले.

हे प्रशिक्षण केंद्र सुरुळीत असून, त्यात पायलट तयार होऊन देश-विदेशात ते सेवा देत आहे. तत्कालीन केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री प्रफ्फुल्ल पटेल यांच्या पुढाकाराने कार्यकाळात बिरसी विमानतळ तयार करण्यात आले. ते आता जिल्ह्यातील प्रवासी आणि शिकाऊ पायलटसाठी मदतपूर्ण ठरत आहे.

### प्रवासी सेवेला वर्षभराचा कालावधी पूर्ण

**बिरसी येथील विमानतळावरून १ डिसेंबरपासून इंडिगो कंपनीने गोंदिया- हैदराबाद-तिरुपती या मार्गावर विमानसेवा सुरू केली आहे. या विमानसेवेमुळे गोंदियासह लगतच्या मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्याची प्रवाशांना सोयीचे होत आहे. प्रवासी विमानसेवेला वर्षभराचा कालावधी पूर्ण झाला असून, या कालावधीत ३३ हजार प्रवाशांनी या विमानतळावरून प्रवास केला आहे.**

### कार्गो सेवेसाठी प्रयत्न सुरू

**बिरसी येथील विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे असून, या विमानतळावरून कार्गो सेवा सुरू करण्यास वाव आहे. गोंदिया जिल्ह्यातून तांदळाची देश-विदेशात मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. तसेच भाजीपाल्यासह इतर वस्तूंची निर्यात करण्यास वाव असल्याने कार्गो सेवा सुरु करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**



### ४५ प्रशिक्षणार्थी घेत आहेत प्रशिक्षण

**सध्या या प्रशिक्षण केंद्रात २५ मुले आणि २० मुली पायलट प्रशिक्षण घेत आहेत. गेल्या दीड वर्षात २० पायलट तयार झाले आहेत, तर भविष्यात या पायलट प्रशिक्षण केंद्राचा विस्तार करण्यात येणार असून, यात प्रशिक्षण घेणाऱ्या पायलटच्या संख्येत पुन्हा वाढ होऊ शकते.**

### हिवाळ्यात सर्वाधिक प्रशिक्षण

**हिवाळ्यात दृश्यता मानाची समस्या असल्याने शिकाऊ पायलटला उड्डाण घेण्यास अडचण होते. पण बिरसी येथील विमानतळावर ही अडचण फारशी येत नाही. त्यामुळे या रायबरेली येथील प्रशिक्षण केंद्राचे सर्वाधिक शिकाऊ पायलट हे हिवाळ्यात चार महिने सर्वाधिक प्रशिक्षण घेण्यासाठी येतात. हिवाळ्यात रायबरेली येथे मोठ्या प्रमाणात धुके राहात असल्यामुळे उड्डाण प्रशिक्षण होत नाही.**





# जिल्ह्याच्या विकास कामाचा निधी गुणवत्तापूर्ण कामांसह निर्धारित वेळेत खर्च करा-पालकमंत्री बाबासाहेब पाटील

**गोंदिया :-** जिल्हा नियोजन समिती मार्फत करावयाच्या विविध विकास कामाचा निधी अंमलबजावणी यंत्रणांनी गुणवत्तापूर्ण कामांसह निर्धारित वेळेत खर्च करावा, असे निर्देश राज्याचे सहकार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात (दि.२५) जिल्हा नियोजन समितीची सभा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

सभेला खासदार डॉ.नामदेव किरसान, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, आमदार सर्वश्री राजकुमार बडोले, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, संजय पुराम, जिल्हाधिकारी प्रजित नायर, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, उपवनसंरक्षक प्रमोदकुमार पंचभाई, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे उपसंचालक पवन जेफ, नियोजन विभागाचे उपायुक्त अनिल गोतमारे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल धोंगडे, निमंत्रित सदस्य व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत मागील सभेच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा करून ते कायम करण्यात आले. इतिवृत्तातील जि.प. शाळेच्या क्रीडांगणासाठी/व्यायामशाळांना देण्यात येणारा निधीचा मुद्दाही या बैठकीत चर्चेला आला. शाळेच्या क्रीडांगणासाठी मागणी केलेल्या सर्व प्रस्तावांना स्थगिती देण्यात येत असून सर्व प्रस्ताव नव्याने मागविण्यात यावे. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी निधी मंजूर करतांना जिल्ह्यातील संपूर्ण तालुक्यात सम प्रमाणात निधी वाटप करावा असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. लाख लागवडीसाठी जिल्हाभर नियोजन करावे असे बैठकीत सांगण्यात आले. जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना व आदिवासी क्षेत्र बाह्य योजना सन २०२४-२५ मध्ये यंत्रणांनी तिन्ही योजनांवर आतापर्यंत ४५ टक्के निधी खर्च झालेला आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या सर्व योजना सोलरवर आणाव्यात असे निर्देश पालकमंत्री यांनी यावेळी दिले. सोबतच अर्धवट योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबतही त्यांनी संबंधित विभागाला सूचना केल्या. गडकिल्ले व पर्यटन यावरील निधी तातडीने खर्च करण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री यांनी दिल्या. जिल्ह्यातील सर्वच विधानसभा क्षेत्रात डिजीटल शाळा उभारण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे असे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले. यासोबतच या बैठकीत जिल्हा विकासाच्या विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. गोंदिया शहरात घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्पासाठी निधी मिळावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. ओबीसी वसतिगृहाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. जागा उपलब्ध झाली असून निधीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा अशा सूचना पालकमंत्र्यांनी केल्या. शासनाच्या योजना जिल्ह्यातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणांनी प्रत्येक योजना लोकाभिमुख करावे अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.


जन सुविधा व नागरी सुविधा अंतर्गत कामे, सनद वाटप, सौर ऊर्जा योजना, जळालेले ट्रान्सफार्मर दुरुस्त करणे, जि.प. शाळेच्या जीर्ण इमारती, प्रत्येक तालुक्यात नाट्यगृह उभारणी, नवेगावबांध पर्यटन विकास, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील इंजोरी उत्तारवाहिनी व कोहलगाव दुर्गामाता तीर्थक्षेत्राचा विकास तसेच तिरोडा तालुक्यातील पोंगेझरा बोळूंदा तीर्थक्षेत्राचा विकास, ढासगड व हाजराफॉल पर्यटनस्थळाचा विकास, दलित वस्ती सुधार योजना, प्रतापगड यात्रेसाठी शासकीय निधी, शेती करण्यासाठी पाण्याचे स्त्रोत, आदिवासी बांधवांकरीता समाज भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात नाट्यगृह उभारण्यात यावे आदी विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

यावेळी नुकतेच आयुध निर्माण फॅक्टरी भंडारा/जवाहरनगर येथे झालेल्या भिषण स्फोटात मृत्यू झालेल्या नागरिकांना श्रध्दांजली अर्पण करुन २ मिनिटे मौन पाळण्यात आले. जिल्हा नियोजन समिती सभा १४ ऑगस्ट २०२४ च्या इतिवृत्तास या बैठकीत मंजूरी देण्यात आली. जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत माहे डिसेंबर २०२४ अखेर झालेल्या (सर्वसाधारण योजना, अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना बाहयक्षेत्र) खर्चाचा आढावा घेण्यात आला. जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या (सर्वसाधारण योजना, अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, आदिवासी उपयोजना बाहयक्षेत्र) प्रारुप आराखड्यास मान्यता देण्यात आली व अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा झाली. सभेचे संचालन जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल धोंगडे यांनी केले, उपस्थितांचे आभार सहायक जिल्हा नियोजन अधिकारी उत्तम शेट्टे यांनी मानले.

# निवडणूक आयोगाची पक्षपाती भूमिका

## लोकशाही रक्षणासाठी निष्पक्षतेची मागणी

**गोंदिया:-** देशातील लोकशाहीच्या भक्कम स्तंभांपैकी एक असलेल्या निवडणूक आयोगाच्या पक्षपाती धोरणावर काँग्रेसने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. महाराष्ट्रातील २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर संशय व्यक्त करत काँग्रेसने निवडणूक आयोगावर पक्षपाती कारभाराचा आरोप केला. नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल आश्चर्यकारक आणि अनाकलनीय असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिका?्यांना दिले. राज्यातील सत्ताधारी भाजपा-युतीच्या विरोधात जनमत असल्याचा दावा करत काँग्रेसने निवडणूक प्रक्रियेत घोटाळा झाल्याचा आरोप केला. लोकसभा निवडणुकीच्या सहा



महिन्यांत तब्बल ५० लाख मतदारांची वाढ आणि मतदानाच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देताना दिलीप बंसोड व काँग्रेसचे पदाधिकारी.

मतदानाच्या दिवशी सायंकाळी ५ वाजता जाहीर करण्यात आलेली मतदानाची टक्केवारी आणि दुस?्या दिवशी सकाळी निवडणूक आयोगाने जाहीर केलेली टक्केवारी यात ७६ लाख मतांची तफावत दिसून आली आहे. टक्केवारीत मोठ्या प्रमाणावर झालेली तफावत याकडे काँग्रेसने लक्ष वेधले. मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर घोळ असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.

निवेदन देतेवेळी जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, माजी आ. गोपालदास अग्रवाल, पी. जी. कटरे, अमर वन्हाडे, रमेश अंबुले, योगेश अग्रवाल, वंदना काळे, मधुसूदन दोनोडे, जितेश राणे, जगदीश येरोला, श्रीकांत घाटबांधे, उषा शहारे, राधिका धरमगुडे, कविता कापगते, छाया नागपुरे, गीता लिल्हारे, संजय बहेकार, रेवाशंकर पटले, महेश उके, संदीप भाटीया, बाबा बागडे, जितेंद्र कटरे यांचा समावेश होता.

# डीपीसीवर वर्णी लावण्यासाठी लागली फिल्डिंग

**गोंदिया :-** जिल्ह्याला पालकमंत्री मिळाल्यानंतर आता जिल्हा नियोजन समितीचे पुनर्गठन प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या समितीत १४जि. प. सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे. यासाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया २० जानेवारीपासून सुरू झाली आहे. तर जिल्हा नियोजन समितीवर वर्णी लागावी यासाठी सर्वच पक्षाच्या सदस्यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे फिल्डिंग लावल्याचे चित्र आहे.

महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (निवडणूक) नियम १९९९ मधील तरतुदीनुसार जिल्हा नियोजन समिती या समितीवरील जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आलेल्या सदस्यांमधून, जिल्हा नियोजन समितीवर सदस्य म्हणून निवडणूक घेण्यासंदर्भात नमुना एक-अ मध्ये नमूद आहे.

२० जानेवारी ते १२ फेब्रुवारी या कालावधीत निवडणूक घेण्यात येणार आहे. २३ जानेवारीपर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजतापर्यंत नामनिर्देशपत्रे जिल्हाधिकारी कार्यालय येथे नियोजन समितीच्या कार्यालयात दाखल करता येणार आहे. ११ फेब्रुवारीला सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत या वेळेत मतदान घेण्यात येणार आहे. गोंदिया जिल्हा परिषदेत एकूण ५३ सदस्य असून यापैकी १४ सदस्यांना जिल्हा नियोजन समितीवर पाठविता येते. यात भाजपचे ८, काँग्रेस ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन जि. प. सदस्यांची वर्णी लागणार आहे. त्यामुळे सदस्यांनी आपल्या पक्षाच्या पक्ष श्रेष्ठींकडे फिल्डिंग लावली असून याकडे नजरा लागल्या आहेत.

निमंत्रित सदस्यांमध्ये कुणाचा नंबर

जिल्हा नियोजन समितीवर ज्या पक्षाचा पालकमंत्री त्या पक्षाचे अधिक वर्चस्व असते हा आजवरचा अनुभव आहे. या समितीवर निमंत्रित सदस्यांचीसुद्धा निवड केली जाते. यात प्रामुख्याने माजी आमदार, पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी यांचा समावेश असतो. त्यामुळे आता यात कुणाचा नंबर लागतो याकडे लक्ष लागले आहे. ११ फेब्रुवारीला निवडणूक होणार असून त्यानंतरच डीपीसीवर कुणाची वर्णी लागली हे कळेल.

# गोंदिया वनविभागांतर्गत सालेकसा वनपरिक्षेत्रात वन्यप्राणी बिबटचा मृत्यू

**गोंदिया:-** दि. २५: गोंदिया वनविभागातील सालेकसा वनपरिक्षेत्रांतर्गत सहवन-क्षेत्र दर्रेकसा भाग १ नियतक्षेत्र टोयागोंदी मधून जाणा-या नागपुर- रायपुर रेल्वे ट्रॅकवर मौजा टोयागोंदी (बिचारपुर) गावाजवळ दिनांक २५.०१ २०२५ ला रात्री २ से ३ वाजताचे सुमारास एक बन्यप्राणी बिबट मृत्यूची घटना घडली असून सदर घटनेची माहिती प्राप्त होताच वनपरिक्षेत्र अधिकारी सालेकसा, क्षेत्र सहायक, दर्रेकसा व त्यांचे अधिनस्त वनरक्षक तसेच. सय्य्द बिलाल अली, पशुधन विकास अधिकारी, पिपरीया, डॉ .सचिन कोकुडे, पशुधन विकास अधिकारी व इतर कर्मचारी यांचेसह मौक्यावर उपस्थित होउन मौकास्थळाची तपासणी करुन मृत बन्यप्राणी बिबटची पाहणी केली असता, मृत बिबटचे सर्व अवयव साबुत असून मृत बिबट



(नर) वय अंदाजे १ वर्षाच्या आ-तील असल्याचे दिसून आले. मृत बिबटच्या शरीरावर अपघातामुळे जखमा तसेच तोंडातून रक्तस्त्राव होत असल्याचे दिसून आले. सदर विबट वन्यप्राण्याचा मृत्यू हा रेल्वे ट्रैक ओलांडत असतांना रेल्वेच्या धडकेने झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

घटनास्थळाचे सविस्तर निरीक्षण करुन पशुधन विकास अधिकारी यांचे उपस्थितीत मृत बिबटच्या शवाची तपासणी करण्यात आली. सदर प्रकरणी मृत बिबटचे शवाचे सविस्तर निरीक्षण केल्यावर शव विच्छेदनाकरीता वनक्षेत्रातील अडचणी लक्षात घेता मृत बिबटचे शव सालेकसा येथील वन आगारात हलविण्यात आले. मृत बिबटचे शव विच्छेदन व पुढील आवश्यक कार्यवाही करीता उपवनसंरक्षक, गोंदिया वनविभाग यांचे स्तरावर समिती गठीत करण्यात आली. पशुचिकीत्सकांकडील शव विच्छेदनाच्या निष्कर्षानुसार बिबटचे मृत्यूचे प्राथमिक कारण हे रेल्वेच्या धडकेमुळे आंतरीक रक्तस्वावाच्या धक्यामुळे झाले असल्याचे निदर्शनास आले.

सदर बिबट वन्यप्राण्याचे मृत्यू प्रकरणी प.सु.री क्रमांक ०४१८७/१०४६३५/२०२५ दिनांक २५.०१ २०२५ अन्वये वनगुन्हा जारी करण्यात आलेला असून, सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) गोंदिया यांचे मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी, सालेकसा हे पुढील तपास करीत आहेत.

# बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी, वनविभागाने बिबट्याला केले जेरबंद

**अर्जुनी मोरगाव :-** शेतात जात असलेल्या एका शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला करून जखमी केले. ही घटना सोमवारी (ता. २७) सकाळी साडेसातच्या सुमारास इटखेडा-संभाजीनगर रस्त्यावरील स्मशानभूमी शेडशेजारी घडली. भास्कर यादव राजगडे (वय ५०, रा. इटखेडा) असे जखमीचे नाव आहे. भास्कर राजगडे हे सकाळी



सायकलने शेतात जात होते. यावेळी स्मशानभूमी शेडशेजारी बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. ही बाब लक्षात येताच माजी सरपंच उद्धव मेहेंदळे व काही गावकऱ्यांनी घटनास्थळ गाठत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली.

दरम्यान, वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येत बिबट्याला जेरबंद केले. हल्ला करणारा बिबट्याही जखमी होता. कोहमारा-वडसा रस्त्यावर वाहनाच्या धडकेत तो जखमी झाला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. भास्कर राजगडे यांच्यावर औषधोपचार करून त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे.

# मजुर सहकारी संस्थेच्या माध्यमातून धूळफेक

## आयकर दाते झाले मजूर १५७ मजुर सहकारी संस्थेत खरे मजूर किती?

**गोंदिया:-** मसहकार विना नाही उध्दार या बिद्र वाक्यातून सर्वसामान्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सहकार विभागाच्या माध्यमातून केले जात आहे. मात्र या ब्रिद वाक्यातून श्रीमंतांनी मजुरांचा नावाचा वापर करून ठेकेदारीचा धंदाच सुरू केला आहे. जिल्ह्यात आजघडीला १५७ मजुर सहकारी संस्था आहेत. या संस्थांचे पदाधिकारी व्हीआयपीआयपी मजूर आहेत. या संस्थेत खऱ्या अर्थाने एकही मजूर दिसून येत नाही. असे असतानाही मजूर सहकारी संस्थांच्या नावाखाली या लुट बाजीला शासनच अभय देत आहे का? असा प्रश्न जिल्ह्यात उपस्थित होत आहे.



मजूरांनी संघटीत होवून कामाच्या माध्यमातून प्रगती करावी, या दृष्टीकोनातून मजूर सहकारी संस्थाची नोंदणी करण्यात आली. या संस्थाना अकुशल कामे वाटप करण्यात आली. परंतु, मजुर नावाचा उपभोग घेवून श्रीमंतच आजघडीला जिल्ह्यात मजूर झाल्याचे उघडपणे पहावयास मिळत आहे. अकुशल कामे तर सोडाच मजूर संस्था कुशल कामेही अधिकृतरित्या करीत आहेत. मजुराच्या नावाखाली मलई खाण्याचा काम गोंदिया जिल्ह्यात जोरदारपणे सुरू आहे. अलीकडे एखाद्या गरीबाची थोडीही आर्थिक परिस्थिती सुधारली की त्याला मिळणाऱ्या योजनापासून वंचित केले जात आहे. तर मग दुसरीकडे व्हीआयपी मजूर किंबहुना आयकर भरणारे मंजूर सहकारी संस्थाचा उपभोग करीत आहेत. त्यामुळे शासनच दुटप्पी धोरण अवलंबून श्रीमंत मजुरांना सहकारी संस्थांच्या माध्यमातून मालसुतो ८८ जिल्ह्यात मजुरांच्या नावाखाली मालसुतो कार्यक्रमच राबविला जात आहे. या मागे शासनाचे दुटप्पी धोरण कारणीभूत आहे. गोंदिया जिल्ह्यात १५७ मजूर सहकारी संस्था आहेत. या सर्व संस्थांचे पदाधिकारी व सदस्य आयकर भरणारे आहेत. आणि ज्या खऱ्या मजुरांचा सदस्य म्हणून नोंदणी आहे. त्या मजुरांना या संस्थेसंदर्भात कसलीही माहिती नाही. योगायोगाने गोंदिया जिल्हयाला पालकमंत्री म्हणून राज्याचे सहकार मंत्री लाभले आहेत. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यात चाललेला धुळफेक कार्यक्रम थांबविण्याची गरज आहे. कार्यक्रम राबवित तर नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे सहकार मंत्रालय या गंभीर बाबीकडे लक्ष केंद्रीत करणार काय? याकडे लक्ष लागले आहे.

### जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था

| | |
|---|---|
| गोंदिया तालुका | ४८ |
| सडक अर्जुनी | ३३ |
| अर्जुनी मोरगाव | १८ |
| आमगाव | १५ |
| देवरी | १४ |
| तिरोडा | १२ |
| गोरेगाव | १० |
| सालेकसा | ०७ |

# खा.प्रफुल पटेलांच्या नेतृत्वात जिल्ह्याला प्रगतीपथावर नेणार-पालकमंत्री बाबासाहेब पाटील

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन



**गोंदिया:-** राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने येथील एन.एम. डी.महाविद्यालयाच्या आडिटोरिअम येथे नवनियुक्त गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना.बाबासाहेब पाटील व नवनिर्वाचित आमदार इंजि.राजकुमार बडोले यांचा सत्कार समारंभ व कार्यकर्ता मेळावा (दि.२५) आयोजित करण्यात आला होता. सोबतच नवनियुक्त जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे, नवनियुक्त सभापती अर्जुनी मोर. सौ.आम्रपाली डोंगरवार, नवनियुक्त उपसभापती शिवलाल जमरे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जाहीर सत्कार माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाला.

शेतकऱ्यांना अधिक समृद्ध करण्यासाठी आर्थिक उन्नती होण्यासाठी शेतीला पूरक व्यवसाय व सहकार क्षेत्राची जोड देण्याचे काम महायुती सरकार करणार आहे. खासदार प्रफुल पटेल यांच्या गृह जिल्ह्याचे पालकमंत्री होण्याचे भाग्य मला लाभले आहे. त्यांच्या नेतृत्वात गोंदिया जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरिता सर्वांना सोबत घेउन जिल्ह्याला प्रगतीपथावर नेण्याचे व जिल्ह्याच्या विकासासाठी जे शक्य होईल ते प्रामाणिकपणे काम करण्याची याची ग्वाही पालकमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी यावेळी दिली.

महाराष्ट्राच्या विकासात सर्वात मोठा वाटा महायुती सरकारचा आहे. खासदार प्रफुल पटेल यांनी दोन्ही जिल्ह्याची प्रगती व उन्नती करण्याचे काम सदैव केले आहे. श्री पटेलजी यांचे सक्षम नेतृत्व आमच्या कडे असल्याने जिल्ह्यात पक्षाचे संगठन मजबूत करण्याचे काम सतत आम्ही करतो असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.

खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात आम्ही काम करतो हे आमचे सौभाग्य आहे. जिल्ह्यातील अनेक समस्या व प्रश्नांना मार्गी लावून विकासाचे नवीन व्हिजन व दुर दृष्टीकोन त्यांच्या कडे आहे. निवडणुकीत आपण निवडून आणून आशीर्वाद दिल्या त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे असे प्रतिपादन आमदार राजकुमार बडोले यांनी केले.

यावेळी प्रदेश प्रतिनिधी, गोंदिया जिल्हाचे सर्व सेल व आघाड्यांचे जिल्हाध्यक्ष, तालुका अध्यक्ष, तालुका महिला अध्यक्ष, तालुका युवक अध्यक्ष, सर्व तालुका सेल व आघाड्यांचे अध्यक्ष, वरिष्ठ पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोंदिया जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी शासन कटिबद्ध-पालकमंत्री बाबासाहेब पाटील

## प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा, पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण

**गोंदिया:-** समृद्ध भारत-विकसित भारत हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. यासाठी ते सातत्याने प्रयत्न करीत आहेत व तसा संकल्पही त्यांनी केला आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सदैव प्रयत्नशील आहे. पंतप्रधानांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र पूर्ण योगदान देईल अशी ग्वाही देतांनाच आपला महाराष्ट्र विकासाच्या दृष्टीने देशात अव्वल व गोंदिया जिल्हा राज्यात अव्वल राहील यासाठी कटिबद्ध होऊया असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

प्रजासत्ताक दिनी आयोजित मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमात ते बोलत होते. पोलीस मुख्यालय मैदान कारंजा गोंदिया येथे आयोजित ७६ व्या प्रजासत्ताक दिनी पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा व राज्य राखीव पोलीस दलाचे समादेशक अमोल गायकवाड मंचावर उपस्थित होते.

सहकार विभागामार्फत राज्यातील १२ हजार प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण करण्यात येणार असून गोंदिया जिल्ह्यातील १२१ सहकारी संस्थांचा यात समावेश आहे. केंद्र पुरस्कृत जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजनेअंतर्गत ३०० ते १००० मे.टन क्षमतेचे गोदाम उभारणीबाबत कार्यवाही सुरु असून या योजनेअंतर्गत पुढील १०० दिवसात १०० गोदामांची उभारणी करण्यात येणार आहे. गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था कनेरी १५०० मे.टन, डोंगरगाव ५०० मे.टन व गोठणगाव ५०० मे.टन क्षमता असलेल्या या तीन संस्थांना मंजूरी देण्यात आलेली असून गोदामाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. पुढील १०० दिवसात सहकार विभागाअंतर्गत विविध सुविधा ऑनलाईन करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांना ऑनलाईन सुविधा पुरविण्याकरीता ७९ सेवा सहकारी संस्थांकडे सी.एस.सी. सेंटरचे कामकाज प्रत्यक्षात सुरु झालेले आहे असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना अधिक समृध्द आणि सशक्त बनविण्यासाठी केंद्र व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी माहिती संच, हंगामी पीक माहिती संच व भूसंदर्भीय भूभाग माहिती संच निर्मीती म्हणजेच "ॲग्रीस्टॅक' या संकल्पनेची महाराष्ट्रात अंमलबजावणी सुरु झाली आहे. ॲग्रीस्टॅक ही एक अशी क्रांतीकारक संकल्पना आहे जी शेतकरी, ग्राहक, विक्रेते आणि सरकार यांना एकत्र आणते. यामधून शेतीच्या प्रक्रियेतील माहिती अचूक व पारदर्शकपणे मिळते असे ते म्हणाले.

जिल्हा पोलीस दलामार्फत जिल्ह्यातील अतिदुर्गम नक्षलग्रस्त परिसरात विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी पूर्ण करण्याच्या उद्देशाने "पोलीस दादालोरा खिडकी' योजनेंतर्गत एक हात मदतीचा हा स्तुत्य उपक्रम राबविला जात आहे. आतापर्यंत ३८ उपक्रमांतर्गत ९ हजार १४५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. जास्तीत जास्त मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्ह्यात सन २०२४-२५ मध्ये एकूण २५५ कोटी ४८ लाख निधी खर्च झालेला असून त्यामधून ६५ लाख



८५ हजार मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झालेली आहे. १ लाख ८१ हजार ८७८ कुटूंबांना रोजगार पुरविण्यात आलेला आहे असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी ध्वजारोहण करुन परेडचे निरीक्षण केले. राज्य राखीव पोलीस दल, पुरुष पोलीस दल, महिला पोलीस दल, पुरुष होमगार्ड पथक, महिला होमगार्ड पथक, माजी सैनिक दल, जे.एम. हायस्कूल गोंदिया, फुलचूर हायस्कुल फुलचूर, शहीद जान्या तिम्या जि.प. हायस्कूल गोरेगाव, जि.प. पूर्व माध्यमिक शाळा रतनारा, पोलीस बँड पथक, पोलीस श्वान पथक, रुग्णवाहिका व अग्नीशमन दल यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

यावेळी भारत सरकारच्या तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३ तसेच ई-सिगारेट बंदीबाबतच्या १८ सप्टेंबर २०१९ च्या अध्यादेशाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता आज प्रजासत्ताक दिनानिमीत्त तंबाखु मुक्तीची सामुहिक शपथ घेण्यात आली. ध्वजारोहणानंतर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक वनिता सायकर, पोलीस हवालदार राजेंद्र मिश्रा आणि "ॲग्रीस्टॅक' अंतर्गत उत्कृष्ट कार्याबद्दल शालिकराम लिचडे, राजकुमार नागपूरे, भैय्यालाल रहमतकर, नोकचंद कापसे यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंजुश्री देशपांडे यांनी केले. कार्यक्रमास जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जि.प.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.तानाजी लोखंडे, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे, माजी जि.प.अर्थ व बांधकाम सभापती संजय टेंभरे यांचेसह विविध विभागाचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

# जाहीर सूचना

गोंदिया जिल्ह्यातील आमगांव तालुक्यातील ग्राम सितेपार अंतर्गत येणारी शेत जमीन गट क्रमांक १४१ व गट क्रमांक १४३ या दोन्ही गटाचा लवाद न्यायालयात सुरु आहे.सदर शेतजमिनीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने सदर शेतजमिनीचे कुठल्याही प्रकारचे व्यवहार ते मग जमिन खरेदी विक्रीचे करता येणार नाही.

त्यामुळे या नोटीसच्या माध्यमातून सर्व जनतेला सुचित करण्यात येते की सदर शेतजमिनीची खरेदी विक्रीचा व्यवहार कुणी केल्यास संबंधित खरीदार व संबंधित विक्री करणारा हे दोन्ही जबाबदार राहतील असे श्री नरेश मनिराम चौधरी व श्री विनोद कुमार सेवकराम चौधरी ग्राम सितेपार तालुका आमगाव जिल्हा गोंदिया यांनी या जाहीर सूचनेद्वारे कळविले आहे.त्यामुळे न्यायप्रविष्ठ शेतजमिनीच्या खरेदी विक्री व्यवहारापासून जनतेने सावध रहावे.